बुधवार, दि १६ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# मधुमेह निदान अभियानाचा एक लाख तपासणी टप्पा ७ महिन्यांत पूर्ण

## रोटरी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या संकल्पनेतून डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेला मोठे यश

**जालना | प्रतिनिधी -** भारताला मधुमेहाची राजधानी म्हटले जाते. जागतिक स्तरावर मधुमेहाचे सर्वाधिक रुग्ण भारतात असूनही जागरूकतेचा अभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. याच पार्श्वभूमीवर जालनासह ११ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या रोटरी प्रांत ३१३२ मध्ये रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर तथा मधुमेह तज्ज्ञ डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलै २०२४ पासून हाती घेण्यात आलेल्या अबकी बार, एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानाने अवघ्या सात महिन्यात एक लाख तपासण्यांचा टप्पा पार केला असून, तपासण्या केलेल्यांपैकी सुमारे १५ टक्के जणांना मधुमेह आणि १६ टक्के जणांना प्री-डायबिटीज असल्याचे निदान झाले आहे. यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर निदान मिळून उपचाराची संधी मिळाली आहे, अशी माहिती प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी पत्रकार परिषदेत दिली. ३० जूनपूर्वीच उद्दिष्ट पूर्ण झाले असलेतरी अभियान अद्याप सुरू आहे. अजूनही अनेक अनभिज्ञ आहेत. त्यांच्यापर्यंत पोहोचणे हीच आपली पुढची जबाबदारी आहे, अशा शब्दांत त्यांनी अभियानाची पुढील दिशा स्पष्ट स्पष्ट केली.

जालना रोटरीच्या इतिहासात ६४ वर्षात प्रथमच जालन्याला डॉ. सुरेश साबू यांच्या रूपाने प्रांतपाल पदाचा बहुमान मिळाला. त्यांच्या संकल्पनेतून रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठीया यांनी प्रांतात पहिल्यांदाच यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलै २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीसाठी ‘अब की बार, एक लाख पार’ हे व्यापक मधुमेह निदान अभियान हाती घेतले आहे. पाच महिने अगोदरच या अभियानाने एक लाख तपासण्यांचा टप्पा पूर्ण करून मोठे यश प्राप्त केले आहे. या अभियानाची सविस्तर माहिती प्रांतपाल डॉ. सुरेश साबू आणि ही मोहीम राबविण्यासाठी पान ३ वर




### पन्नालाल बगडिया यांचे अमूल्य योगदान

एक काळ असा होता की एखाद्याला क्वचित मधुमेह जडायचा. माझ्या आई-वडिलांना चाळीस वर्षे मधुमेह होता. मलाही आहे. आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यामुळे आम्ही उपचार घेऊ शकलो; पण सर्वसामान्यांवर अशी वेळ येऊ नये म्हणून आम्ही ‘मधुमेह निदान अभियानात’ सहभागी झालो. हे अभियान समाजाच्या आरोग्यसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे यासाठी आमचे आर्थिक योगदान यापुढेही सतत राहणार आहे, अशी ग्वाही या अभियानासाठी आतापर्यंत ३० हजार मधुमेह तपासणी किट्स उपलब्ध करून देणारे सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली.

### युवा आदर्श टंचाई ...

उभा दारात दुष्काळ
एक्काहत्तरची भिती
पाणीसाठा शिल्लक
उरलायं कुठे किती
डोळस निर्णय जरुरी
कठीण रे परिस्थिती
नियोजन कठोरपणे
अजून सर्व असे हाती
उठवावे कुंभकर्णाना
हो पुनश्च जनजागृती
स्वत:पासून सुरुवात
वापर आवर घरगुती
जागोजाग अव्याहत
चालू नीत नीरगळती
तुला मला न कुणाला
पाण्याची झाली माती
पडे धरणास भगदाडे
ऐकूनि सुन्न होते मती
पाणी उत्सर्जन करायं
वादा वादीने सहमती
वॉटरपार्क बेबंध चाले
कारंजे थुईथुई नाचती
काटकसर रे जराकरा
कित्येक जीव वाचती
प्रश्न सोडवा दुसऱ्याने
परावलंबी ही विकृती
जिम्मेदारी सामुदायिक
बदलेल संकट आकृती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संवाद मराठवाड्याशी उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार

## विभागातील गरजू शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

**जालना | प्रतिनिधी -** मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील गरजू नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत विभागीय आयुक्त दिलीप गावडे संवाद साधणार आहेत.

जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने गरजू शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करण्यासाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या पान ३ वर

# श्री गुरुदेव विद्या मंदिर वडीगोद्रीच्या विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

**अंबड | प्रतिनिधी -** तालुक्यातील वडीगोद्री येथील श्री गुरुदेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पाण्याचे वॉटर फिल्टर चे उद्घाटन दिनांक ९ एप्रिल रोजी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विद्या समितीचे अध्यक्ष श्री समाधान जी मडके सर तसेच वडीगोद्रीचे सरपंच पंढरीनाथ नाना खटके व प्राचार्य आर.के. माळी सर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर दांडगे मॅडम, मुंडे सर, जी. आर .गावडे सर, प्रा. खांडेभराड सर उपस्थित होते... उद्घाटन झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वडीगोद्रीचे सरपंच खटके नाना त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे कार्य या ठिकाणी शाळेच्या वतीने करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी मडके सर व माळी सर यांचे प्रथम धन्यवाद व्यक्त करतो. कारण आपल्या शाळेत जवळपास ११०० विद्यार्थी शिक्षण घेतात या विद्यार्थ्यांना पाणी शाळेमध्ये उपलब्ध होते परंतु आता आजकाल सर्व ठिकाणी घरी असो, मार्केटमध्ये असो, किंवा हॉटेलमध्ये विविध रोगापासून संरक्षण होण्यासाठी आपण सर्वजण शुद्ध पाणी विकत घेऊन पितो. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यास मिळाल्यामुळे विद्यार्थी आजारी पडणार नाही. तसेच या शाळेच्या विविध कार्यक्रमासाठी मी नेहमीच उपस्थित असतो मला ग्रामपंचायत पान ३ वर

# नवीन चारचाकी धारकांनी पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना | प्रतिनिधी -** नॉन ट्रान्सपोर्ट चारचाकी मोटार जीप/कारसाठी नोंदणी मालिका एमएच २१ सी.ए. ही सद्यस्थितीत सुरु असून या मालिकेतील क्रमांकाचे वाटप पूर्ण होत आहे. जिल्ह्यातील नॉन ट्रान्सपोर्ट चारचाकी मोटार जीप/कार वाहनांसाठी एमएच- २१ सी जी 000१ ते ९९९९ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. तरी ज्या वाहनधारकांना आपल्या दुचाकी वाहनासाठी पसंतीचा क्रमांक घ्यावयाचा आहे अशा व्यक्तींनी दि.२१ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्जासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ किमतीचा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट, ओळखपत्राच्या (आधारकार्ड) छायांकित प्रतिसह (स्वयंसाक्षांकीत), पॅनकार्ड व दुरध्वनी क्रमांकासह दि. २१ एप्रिल २०२५रोजी दुपारी २ वाजेपर्यंत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना कार्यालयात अर्ज जमा करावा. नवीन मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप ’महाराष्ट्र मोटार वाहन नियम’ व परिवहन आयुक्तांचे परिपत्रकानूसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी अनेक अर्जदारांनी अर्ज केल्यास त्यासाठी विहीत पध्दतीने लिलावाची प्रक्रीया अवलंबिण्यात येईल. एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज आलेले असतील तर एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त आलेल्या अर्जदारांनी वाढीव रकमेचा एक धनाकर्ष आणणे आवश्यक आहे. पहिला धनाकर्ष मुळ किंमतीचा व दुसरा धनाकर्ष आपण लावलेल्या बोलीच्या वाढीच्या रकमेचा असावा. धनाकर्ष विहीत शुल्कापेक्षा सर्वात जास्त रकमेचे ज्यांचे असतील त्यांनाच हा क्रमांक आरक्षित करुन दिला जाईल. सर्व संबंधितांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना पान ३ वर

# संपादकीय

## विनोदाचा बादशहा

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांची आज जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो. त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा. चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट ' द कीड ' याचं ओपनिंग टायटल होतं अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर. स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता प्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.


**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**जालना | प्रतिनिधी** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी निवासी उप जिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपविभागीय अधिकारी श्रीमंत हरकर, जालना तहसीलदार छाया पवार, नायब तहसीलदार तुषार निकम, सहाय्यक महसूल अधिकारी दिपाली राऊत, महसूल सहायक कल्याणकर यांच्यासह प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.





हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

पान १ वरुन

## मधुमेह निदान ...

अविरत परिश्रम घेणारे डॉ. राजेश सेठिया यांनी मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी हॉटेल मधुबनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे, ज्येष्ठ रोटेरियन अरुण अग्रवाल, रो. डॉ. नितीन खंडेलवाल, रोटरी क्लब जालनाचे अध्यक्ष रो. डॉ. दीपक बगडिया, रो. संतोष तिवारी, रो. राजेंद्र अग्रवाल आदींची उपस्थिती होती.

यासंदर्भात अधिक माहिती देताना डॉ. साबू म्हणाले की, प्रांतपाल म्हणून आपण जबाबदारी स्वीकारल्यानंतर प्रांतपाल पदाला पूर्णपणे न्याय देण्याचा प्रयत्न करत आलो आहे. आतापर्यंत १३ हजार ४५२ सेवा प्रकल्प रोटरी प्रांतात राबवले गेले आहेत. त्यात पाणी, स्वच्छता, पर्यावरण, सामाजिक व आर्थिक प्रकल्प, आजार निदान व दक्षता, शांतता प्रस्थापित करणे, महिला व बाल आरोग्य आधी सेवा प्रकल्पांचा समावेश आहे. यासाठी एकूण ११ कोटी २ लाख ३७ हजार ९९३ रुपयांचा निधी खर्च झाला असून, रोटरी सदस्यांनी १० लाख ४८ हजार तास सेवा कार्यात घालवले आहेत. भारत हा जगातला मधुमेहाची राजधानी मानला जातो. मात्र, त्या प्रमाणात जनजागृती फारच कमी आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठीच 'अब की बार, एक लाख पार' हे अभियान रोटरी प्रांत ३१३२ मध्ये राबविण्याची जबाबदारी डॉ. सेठीया यांनी स्वीकारली आणि ११ जिल्ह्यांतील ९८ क्लब्सने यात सक्रिय सहभाग नोंदवला. प्रांतात अशा प्रकारचे मधुमेह जनजागृतीपर अभियान प्रथमच हाती घेण्यात आले. भारतात सर्वाधिक मधुमेहाचे रुग्ण असतानाही त्या प्रमाणात जागरूकता नाही. म्हणूनच, या मोहिमेची संकल्पना रोटरीच्या माध्यमातून पुढे आली आणि अवघ्या सात महिन्यातच डॉ. सेठीया यांच्या अथक प्रयत्नातून प्रांतातील क्लबसने एक लाखाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण करून मधुमेहाबाबत जनजागृती निर्माण करण्यात मिळविलेल्या यशामुळे आपण अत्यंत समाधानी असून, आरोग्यविषयक उपक्रमातील माझ्या कार्यकाळातील ही उपलब्ध संस्मरणीय ठरेल, असा विश्वास डॉ. साबू यांनी यावेळी व्यक्त केला.

मधुमेह निदान अभियानाबाबत अधिक माहिती देताना, डॉ. सेठिया यांनी सांगितले की, प्रांतपाल डॉ. साबू आणि आपण अब की बार एक लाख पार हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतल्यानंतर सर्वप्रथम लातूर येथे प्रांतातील ९८ क्लबचे अध्यक्ष आणि सचिवांची बैठक घेऊन या अभियानाचा रोडमॅप बनविला आणि प्रांतीय मुख्यालय असलेल्या जालन्यापासून सुरुवात केली. या अभियानासाठी सौ जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे पन्नालाल बगडिया यांनी सुरुवातीपासूनच आर्थिक योगदानाची जबाबदारी स्वीकारली आणि आजही त्यांचे योगदान सुरू आहे. जालनासह प्रांतात मंदिर, मशिद, चर्च, गुरुद्वारा, रेल्वे स्टेशन, विविध चौक, विमान, बस स्टँड, नवरात्र, गणेशोत्सव आदी गर्दीच्या ठिकाणी तपासण्या केल्या गेल्या. स्वतःहून कोणी मधुमेह तपासणी करत नाही, त्यामुळे आम्हीच त्यांच्या दारात गेलो. फक्त पाच सेकंदात निदान शक्य आहे, हे पटवून दिले. मोहिमेमुळे जनतेला मधुमेहाची जाणीव झाली आणि त्याला टाळण्याच्या उपायांबद्दल माहिती मिळाली. वेळीच निदान झाल्यास तात्काळ उपचारामुळे मधुमेहाला नियंत्रित ठेवता येते. प्री-डायबिटीजला मधुमेह होण्यापासून रोखता येते किंवा पुढे ढकलता येते. अनुवंशिकता असल्यास नियमित व्यायाम, ताण तणाव व्यवस्थापन आणि जीवनशैली बदलून मधुमेह होण्यापासून वाचविता येऊ शकते, याचे महत्त्व पटवून देण्यात आले. मधुमेह हा कुणालाही होऊ शकतो, हे विचारात घेऊन मंदिरे, मज्जिद, गुरुदारा, चर्च आदी ठिकाणी देखील शिबिरे घेतली. पुढील आठवड्यात अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथील ३५० वर्ष जुन्या मस्जिदमध्ये मधुमेह निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यात ३० हजार मधुमेह निदान तपासण्या करण्यात आल्या. आगामी तीन महिन्यात किमान दहा हजार तपासण्या होतील. बडी सडकवरील रुबी हॉस्पिटलमध्येही प्रारंभी पासूनच तपासण्या करण्यात येत असून दररोज किमान ३० जणांची तपासणी होत आहे. या ठिकाणी सदैव तपासणी सुरू राहील, असे सांगून यासाठी पन्नालाल बगडिया यांचे सर्वतोपरी आर्थिक योगदान लाभत असून, आतापर्यंत त्यांनी मोफत मधुमेह तपासणीसाठी ३० हजार किट्स दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. जालना जिल्ह्यातील या यशस्वी मोहिमेमध्ये डॉ. लीना पवार, सौ. सरला सेठिया, रो. संतोष तिवारी,




डॉ. नितीन खंडेलवाल, डॉ. प्रतीक पवार, रुबी हॉस्पिटलचा स्टाफ परिचारिका शुभांगी श्रीसुंदर, सारिका घारेगावकर, सतीश वरखडे, सोनाली घुमरे, संगीता लांडगे, चंदा दाभाडे, शर्मिला सिन्हा यांनी समर्पित भावनेने योगदान दिले. सोबतच संपूर्ण रोटरी परिवार, विविध सामाजिक संघटना, रुबी हॉस्पिटलचा स्टाचे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. पाच महिने अगोदर एक लाख तपासण्यांचा पार केलेला टप्पा प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांना बर्थडे गिफ्ट म्हणून आम्ही समर्पित केल्याचे डॉ. सेठीया यांनी सांगितले.

भारतात ७ कोटी ७० लाख मधुमेह रुग्ण आणि १० कोटी ४३ लाख प्री-डायबिटीक नागरिक आहेत. दरवर्षी ७ लाख लोक मधुमेहाने मृत्युमुखी पडतात. मध्यमवर्गीय कुटुंबाच्या उत्पन्नाच्या २५ टक्के खर्च केवळ या आजारावर होतो. त्यामुळे वेळेवर निदान, आहार-व्यायामाचे नियमन आणि जनजागृती हाच प्रभावी उपाय आहे. मोहिमेतील महत्त्वाचा भाग म्हणजे आम्ही जनतेपर्यंत स्वतः पोहोचलो. लोकांना तपासणीसाठी विनंती केली. खर्च आणि वेळ याची पर्वा न करता फक्त पाच सेकंदांत होणाऱ्या तपासणीद्वारे हे व्यापक निदान शक्य झाले. आमच्या प्रयत्नाने एका रुग्णाच्या निदानामुळे एकूण कुटुंब जागरूक झाले, असे सांगून त्यांनी या अभियानाची सामाजिक महत्व अधोरेखित केले.

**अभियान पुढे सुरूच राहणार**

हे अभियान एक लाख तपासण्या पूर्ण करूनही येथे थांबणार नाही. पुढेही दररोज निदान शिबिरे, मोफत तपासण्या सुरूच राहणार आहेत, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेला उपस्थित पत्रकार आणि रोटरी परिवारातील सदस्यांसाठी मधुमेह निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात डॉ. लीना पवार, सौ. सरला सेठीया आणि सतीश वरखडे यांनी तपासणी केली.

पत्रकार परिषदेला रोटरी परिवारातील केतनभाई शहा, गोपाल मुंदडा, डॉ. सुमित्रा गादीया, अनया अग्रवाल, गौरव करवा, सागर दक्षिणी, पराग नेमाडे, वर्षा पित्ती, अंकित अग्रवाल, डॉ. सूर्यकांत हयातनगरकर, डॉ. सौ. अलका हयातनगरकर, डॉ. लीना पवार, विवेक मणियार, सुनंदा शहा, डॉ. सौ. प्रतिभा श्रीपत, मधुलता भक्कड, स्मिता भक्कड, संजय काबरा, जगदीश समदानी, राजकुमार रुणवाल, राजनंदिनी राठोड आदींची उपस्थिती होती.

## श्री गुरुदेव ...

मार्फत जे काही शाळेच्या विकासासाठी करता येईल त्या योजना मी राबवण्याचे काम करीत असते. विद्यार्थ्यांनी पाणी वाया न घालता व्यवस्थित वापरले पाहिजे. कारण भविष्यामध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वाटते. तसेच प्राचार्य आर.के माळी सर यांनी सांगितले की वॉटर फिल्टर चे पाणी आपण सर्वांनी जपून वापरले पाहिजे. जल है तो कल है त्याचबरोबर आम्ही गावकऱ्यांच्या विद्यार्थ्यांसाठी ज्या मागण्या आहेत त्या आम्ही पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतो. शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी शाळेतच उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी आजारी पडणार नाही. विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवण्याचे काम आम्ही सर्व शिक्षक करत असतो. त्यामध्ये गावकऱ्यांचे सहकार्य लाभत असते. तसेच वॉटर फिल्टर ची काळजी घेणे हे सर्व शिक्षकांचे काम आहे. अजूनही काही शाळेसाठी विकासाचे कार्य करायचे आहे त्यामध्ये संस्थेने आम्हाला सहकार्य करावे असेही त्यांनी सांगितले... बाहेरगावीच्या विद्यार्थ्यांचा बसचा प्रश्न असो किंवा महाराष्ट्र शासनातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धात्मक परीक्षा मध्ये गुरुदेव शाळेचे विद्यार्थी नेहमीच भाग घेत असतात... या कार्यक्रमासाठी विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळी सर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री खिलारे सर यांनी केले त्याचबरोबर साळुंखे सर, पाटील सर, वाघमारे सर, सुरासे सर, येरावाड सर, बोरकर सर, सुळसुळे सर, प्रा. गणेश खटके सर, पिंपरे मॅडम,काळे सर, लिंगायत, आप्पा चव्हाण उपस्थित होते.

## नवीन चारचाकी ...

यांच्या नावावर आपले धनाकर्ष बंद लिफाफ्यात दि. २१ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सादर करावेत. वेळेनंतर कोणत्याही सबबीवर धनाकर्ष जमा करुन घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच दुपारी ३ वाजता बंद लिफाफे उघडण्यात येतील. त्यावेळी सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## संवाद मराठवाड्याशी ...

उपस्थितीत सर्व गरजू शेतकऱ्यांशी या वेबिनारच्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्यात येणार आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. गरजू नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. तरी विभागातील सर्व गरजू शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

शिवरस्ते, पाणंद रस्ते याबाबत संवाद.

Wednesday pril 16, 15:45 - 18:00

https://us06web.zoom.us/j/83997100847...

Meeting ID: 839 9710 0847

Passcode: 073227

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

# अंबड तालुका ग्रामीण पत्रकार कार्यकारणी जाहीर

**धाकलगांव । प्रतिनिधी -** अंबड तालुका ग्रामीण पत्रकार संघांच्या अध्यक्षपदी अनंत मुंडे उपाध्यक्षपदी रमेश सुरवसे तर सचिव पदी पवन पवार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

दि.१०एप्रिल रोजी वडीगोद्री येथे ग्रामीण भागातील पत्रकारांच्या बैठकीत नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे

यावेळी सदस्यांनी दिलीप पवार, दिलीप दखने,,रवींद्र घाडगे, रोहिदास पवार, सुरेश काळे , चक्रधर नाटकर ,पांडुरंग सोळुंके ,फकीर मोहम्मद बागवान, ड.राजेंद्र पवार, शैलेश मरकड ,अशोक गायकवाड , अशोक चांगले , सुदर्शन गावडे, किर्तीनंद गांगुर्डे, मुकेश डुचे , माऊली दाबोले, बंडू शिंगटे, रजनिस कनके , कैलास खरात ड.

मोहन रोटे आदी उपस्थित होते. निवडीनंतर मावळत्या कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांच्या वतीने अंबड तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित सर्व पदाधिकारी यांचा शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्या, शेतकरी संघटना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, प्रहार संघटना, सर्व राजकीय पक्षांनी व सामाजिक संस्थानी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला

# जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्याचा शुभारंभ

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील जलसंपदा विभाग, महसूल विभाग, जिल्हा परिषद, कृषी विभाग, महानगर पालिका व इतर शासकीय यंत्रणांनी एकत्रित येऊन सिंचन विषयक अडचणी, सुधारणा व व्यवस्थापन याबाबत विविध प्रकारचे प्रशिक्षण, व्याख्याने, चर्चासत्र व इतर लोककलेची सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन समाजामध्ये जनजागृती करण्याची मोहीम हाती घेतली. त्यानुसार आज दि. १५ एप्रिल २०२५ पासून सुरु होणाऱ्या जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्याचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील पाच नद्यांचे जल असलेल्या कलशाचे पूजन करुन करण्यात आला. जलसंपदा मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे संकल्पनेतील सिंचन, पाणीवापर, पीकपध्दती या विविध बाबींचे महत्व जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याकरिता जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२५ ची घोषणा करण्यात आली. यामध्ये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जलसंपदा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या गावांमध्ये जलसाक्षरता करुन सिंचनाचे महत्व समाज बांधवांच्या मनावर रुजविण्याकरिता जिल्हानिहाय 'पालक अभियंता' यांची नेमणुक करण्यात आली. त्यानुसार जालना जिल्ह्यासाठी अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे यांची पालक अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये अधीक्षक अभियंता तथा पालक अभियंभारत शिंगाडे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कार्यकारी अभियंता रोहित देशमुख, सुरेखा कोरके आदिसह जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणा, जलदूत, शेतकरी, स्वयंसेवी संघटना, यांनी सहभाग नोंदविला. जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता सर्वांनी जलप्रतिज्ञा घेतली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन श्रीमती कोरके यांनी कृती पंधरवाडयाची रुपरेषा प्रस्तावित केली. व श्री. देशमुख यांनी जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या सिंचन विषयक बाबी सादर केल्या. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या भाषणासह योगेश माने यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. असेही कळविण्यात आले आहे.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालयात उत्साहात साजरी



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक, क्रांतिकारी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालय, जालना व मस्तगड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, राजेश जोशी, देविदास देशमुख, शिवराज जाधव, जगदीश येनगुपटला, सोमेश काबलीये, संतोष खंडेलवाल, विकास कदम, सागर वाहूळकर, डोंगरसिंग साबळे, गौरव गोधेकर, आदींची उपस्थिती होती.

## सिंधीकाळेगाव येथे गाजिखान बाबा उरुसानिमीत्त यात्रा

**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथे अनेक वर्षा पासुन चालत आलेल्या परपंरेनुसार गाजिखान बाबा व सय्यद साहब यांच्या उरुसाला उद्या १६ एप्रिल पासुन सुरवात होणार आहे . त्या मुळे गावात आनंदी वातावरण आहे. गेल्या अनेक वर्षापासुन चालत आलेल्या या परपंरेला सर्व भाविकांनी या पारंपारीक रुढिला कायम ठेवले आहे. वर्षातून एकदा गावात यात्रा भरत असल्याने यात्रे निमीत्त सर्वाच्या भेटीगाठी होत असल्याने समाधानी व्यक्त करीत आहे.सिंधीकाळेगाव येथील गाजिखान बाबा व सय्यद साहब यांच्या तीन दिवसांचा पुर्ण कार्यक्रम असेल तेव्हडा गावातील हिंदु-मुस्लिम मिळुनच साजरा करतात. या तीन दिवसांच्या यात्रेला परिसरातील गावातील हिंदू -मुस्लिम बाधंव मोठ्या प्रमाणात येत असतात. सिंधी काळेगाव येथील अनेक कुंटुब कामानिमीत्त छत्रपती संभाजीनगर ,पुणे ,मुंबई, नाशिक या शहरामध्ये स्थाईक झाले आहेत. त्या मुळे हे बाहेरगावी गेलेले कुंटुब वर्षातुन ३ ते५ दिवस ऊरूसा निमीत्त गावात येतात व गावात सर्वाच्या भेटीगाठी होत असल्याने त्यांचा आनंद सर्वाच्या चेहर्यावर दिसुन येतो.या तीन दिवसाच्या यात्रेमध्ये दिनांक १६ रोजी रात्री ८ वाजता संदल निघणार आहे. दिनांक १७ रोजी रात्री ९ वाजता गलप निघणार असुन संपुर्ण गावात गावात शोभायात्रा काढुन रात्री २ वाजेच्या सुमारास दर्ग्यात पोहचत असते.दरम्याण १६ व १७ तारखेला गावात भव्य यात्रा भरते या यात्रेमध्ये लहाण मुलांची खेळणी ,हॉटेल्स,घर उपयोगी वस्तु, रहाट पाळणा येत असतात.

## समाजवादी पक्षातर्फे बाबासाहेबांना अभिवादन



**पुणे । प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली लोकशाही जपण्यासाठी समाजवादी पक्ष कटीबद्ध आहे. संविधानातील मुल्यांच्या रक्षणासाठी प्राणपणाने लढण्याचा समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त निर्धार केला आहे.

पुणे स्टेशन येथील बाबासाहेबांच्या पूर्ण कृती पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी समाजातील पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर, अनिस अहमद प्रदेश सरचिटणीस, साधना शिंदे जिल्हाध्यक्षा, दत्ता पाकिरे शहर सरचिटणीस, विनायक लांबे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, अनिरुद्ध सुर्यवंशी शहर उपाध्यक्ष, शहाजहान झारी शहर चिटणीस, वसंतराव कोळी खडकवासला मतदारसंघ अध्यक्ष, जावेद शेख छत्रपती शिवाजी महाराज नगर मतदारसंघ अध्यक्ष, अशोक गायकवाड शहर कार्यकारिणी सदस्य, इब्राहिम यवतमाळवाले, सलिम बडगेर, भारत मालुसरे, सुरेश कांबळे आदी उपस्थित होते.